**प्रकल्प प्रवर्तक मे. ज्ञानलक्ष्मी डेव्हलपर्स, भालचंद्र कृपा अपार्टमेंट, आचरा रोड, कणकवली, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग - ४१६ ६०२, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत मेघरे बॉक्साईट मायनिंग प्रकल्प, मेघरे, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील प्रस्तावित बॉक्साईट उत्पादन विस्तारीकरण ७५,०००.० टन प्रतिवर्ष पासून ५,००,०००.० टन प्रतिवर्ष पर्यत (४,२५,०००.० टन प्रतिवर्ष वाढ) प्रकल्प क्षेत्र ५५.०६ हेक्टर (खाजगी जमिन) संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त -**

प्रकल्प प्रवर्तक मे. ज्ञानलक्ष्मी डेव्हलपर्स, भालचंद्र कृपा अपार्टमेंट, आचरा रोड, कणकवली, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग - ४१६ ६०२, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत मेघरे बॉक्साईट मायनिंग प्रकल्प, मेघरे, तालुका-श्रीवर्धन, *जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील प्रस्तावित बॉक्साईट उत्पादन विस्तारीकरण* ७५,०००.० टन प्रतिवर्ष पासून ५,००,०००.० टन प्रतिवर्ष पर्यत (४,२५,०००.० टन प्रतिवर्ष वाढ) प्रकल्प क्षेत्र ५५.०६ हेक्टर (खाजगी जमिन) संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी मंगळवार, दिनांक ०९ जून, २०२६ रोजी दुपारी १.३० वाजता प्रकल्प स्थळाजवळील सामाजिक सभागृहासमोर, मुक्काम-दीपकवाडी, मेघरे, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

*श्री तानाजी पाटील*, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,महाड तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,अलिबाग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री संजय भोसले, प्रादेशिक

अधिकारी-रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर,नवी मुंबई - ४०० ६१४ तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की *भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय*, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिति जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक **मे. ज्ञानलक्ष्मी डेव्हलपर्स, भालचंद्र कृपा अपार्टमेंट, आचरा रोड, कणकवली, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग - ४१६ ६०२, महाराष्ट्र राज्य** यांचा त्यांच्या कार्यरत मेघरे बॉक्साईट मायनिंग प्रकल्प, मेघरे, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील प्रस्तावित बॉक्साईट उत्पादन विस्तारीकरण ७५,०००.० टन प्रतिवर्ष पासून ५,००,०००.० टन प्रतिवर्ष पर्यत (४,२५,०००.० टन प्रतिवर्ष वाढ) प्रकल्प क्षेत्र ५५.०६ हेक्टर (खाजगी जमिन)

संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक ०३.०२.२०२६ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग ब - १ अनुसुची १ (ए) अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण (एसईआयएए), पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र शासनाने दिनांक ०५-०४-२०२४ च्या आदेशाव्दारे सदर ५५.०६ हेक्टर क्षेत्रावरिल खाणपट्टा श्री मनोहर व्ही. दर्यानानी यांच्याकडून मे. ज्ञानलक्ष्मी डेव्हलपर्स यांच्या नावे हस्तांतरित करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे.

प्रकल्पासाठी खाणकाम आराखडा भारतीय खाण ब्युरो (IBM) ने दिनांक ०५.०८.२०२५ रोजी मंजूर केलेला आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (Terms of Reference - ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २२.०५.२०२५ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक २०-०९-२०२५ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ऑक्टोबर, २०२४ ते डिसेंबर, २०२४ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य

परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रमांक MPCB/JD(WPC)Env-PH/B-260212-FTS-0137 दिनांक १२.०२.२०२६ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांनी पत्र दिनांक ११.०३.२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी, रायगड यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, रायगड यांनी त्यांच्या पत्र दिनांक २९.०५.२०२६ नुसार प्रत्यक्ष (Physical) तसेच ऑनलाईन पर्यावरणविषयक जनसुनावणी मंगळवार, दिनांक ०९ जून, २०२६ रोजी दुपारी ०१.३० वाजता प्रकल्प स्थळाजवळील सामाजिक सभागृहासमोर, मुक्काम-दीपकवाडी, मेघरे, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश दिनांक १६-०५-२०२६ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी,रायगड, - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(उप विभागीय दंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

**२)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - **सदस्य**
यांचे प्रतिनिधी -
प्रादेशिक अधिकारी - रायगड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, नवी मुंबई

३) उप प्रादेशिक अधिकारी - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सागर यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र फ्री प्रेस जर्नल यात इंग्रजीत दिनांक ०७-०५-२०२६ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठी आवश्यक असणा-या प्रणालीची माहिती देण्यात आलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड.अलिबाग,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड.अलिबाग

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड.अलिबाग,

५) उप विभागीय अधिकारी, श्रीवर्धन, जिल्हा - रायगड,

६) सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड भवन, ६वा मजला, कोकण भवन विस्तार, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

७) सहमुख्य विस्फोटक निरिक्षक, अ-१ व अ-२ विंग, ५वा मजला, सीजीओ कॉम्प्लेस, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

८) तहसीलदार, तहसील कार्यालय,श्रीवर्धन, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड,

९) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,श्रीवर्धन, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड,

१०) मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगरपरिषद,तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगड,

११) ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालये- ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय-मेघरे,तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड

१२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१४) प्रादेशिक अधिकारी-रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर,नवी मुंबई - ४०० ६१४

१५) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सी.एफ.सी. बिल्डिंग,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसर, महाड,तालुका-महाड, जिल्हा-रायगड-४०२ ३०९

१६) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई - मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,महाड यांना ६ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप,हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या

संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक **मे. ज्ञानलक्ष्मी डेव्हलपर्स, भालचंद्र कृपा अपार्टमेंट, आचरा रोड, कणकवली, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग - ४१६ ६०२, महाराष्ट्र राज्य** यांनी त्यांच्या कार्यरत मेघरे बॉक्साईट मायनिंग प्रकल्प, मेघरे, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील प्रस्तावित बॉक्साईट उत्पादन विस्तारीकरण ७५,०००.० टन प्रतिवर्ष पासून ५,००,०००.० टन प्रतिवर्ष पर्यत (४,२५,०००.० टन प्रतिवर्ष वाढ) करण्याचे योजिलेले आहे. प्रकल्प क्षेत्र ५५.०६ हेक्टर (खाजगी जमिन) आहे.

महाराष्ट्र शासनाने दिनांक ०५-०४-२०२४ च्या आदेशानुसार सदर ५५.०६ हेक्टर क्षेत्रावरिल खाणपट्टा श्री मनोहर व्ही. दर्यानानी यांच्याकडून मे. ज्ञानलक्ष्मी डेव्हलपर्स यांच्या नावे हस्तांतरित करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे.

तसेच मे. ज्ञानलक्ष्मी डेव्हलपर्स यांच्या नावे खाणयोजना (Mining Plan) तसेच प्रोगेसिव्ह माईन क्लोजर प्लॅन (PMCP) मधील बदल सन २०२४-२५ ते २०२७-२८ या कालावधीसाठी भारत सरकारच्या भारतीय खाण ब्युरो (IBM) ने दिनांक ०७-०१-२०२५ रोजी मंजूर करण्यात आलेले आहेत.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर येथील एकात्किम प्रादेशिक कार्यालयाकडून अनिवार्य अनुपालन अहवाल (Certified Compliance Report) दिनांक २२-१२-२०२५ रोजी प्राप्त झालेला आहे.

प्रकल्पात खनिज भंडार - बॉक्साईट - १०.७६८ दशलक्ष टन असून खनन योग्य साठा - ७.९१५ दशलक्ष टन एवढा आहे. खाणीची खोली १०.० मीटर एवढी राहिल. खाणीचा अपेक्षित कालावधी हा १६ वर्षे आहे. खाणकाम करताना ब्लास्टिंग केले जाणार नाही.

वन्यजीव संरक्षण कायद्याच्या अनुसुची १ मधील प्राण्यांसाठी वन्यजीव संवर्धन योजना तयार करण्यात आलेली आहे.

प्रकल्पाची भांडवली किंमत ही ₹ ७७०.० लाख एवढी आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार प्रकल्पाच्या एकूण भूखंडाच्या ३३% हरितपट्टा विकसित करण्यात येईल. प्रकल्पात कुशल आणि अकुशल संवर्गातील ३७ व्यक्तींची गरज असुन प्रकल्पातील रोजगारासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. मात्र सदरहू प्रकल्प स्थापनेमुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

प्रकल्पाचे कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीएसआर) अंदाजपत्रक सुमारे ₹ १०/- लाख असून प्रकल्प प्रभावित गावातच ते खर्च करण्यात येईल. पहिल्या पाच वर्षात सीएसआर उपक्रमांसाठी आवर्ती खर्च म्हणून सुमारे ₹ १.५० लाख प्रतिवर्ष खर्च करण्यात येतील.

तसेच प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापनसाठी प्रस्तावित भांडवली खर्च ₹ ७२.५० लाख असून आवर्ती खर्च ₹ १७.० लाख एवढा असेल.

सीएसआर व्यतिरिक्त कंपनीने खाण प्रकल्पासाठी कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) निधी भांडवली खर्चाच्या २% राखीव ठेवलेला असून जनसुनावणी दरम्यान स्थानिकांनी उपस्थित केलेल्या पर्यावरणीय सूचना अंमलबजावणीसाठी ₹ १५.५० लाख एवढी रक्कम खर्च करण्यात येणार आहे.

सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी ,पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. आपली भूमिका मांडताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे. आपले विचार, सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी नोंदविताना जर तो मुद्दा उपस्थितांना अगोदर उपस्थित केलेला असेल, तर तो मांडण्याची आवश्यकता नाही, जेणेकरुन अधिक उपस्थितांना संधि देता येतील.

अध्यक्ष यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे. तरी ज्यांना सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आहे, त्यांनी हात वर करा, जेणेकरुन प्रत्येकाला माईकसमोर येऊन संधि देण्यात येईल.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री गोविंद रामचंद्र निवासे, राहणार-मेघरे गाव, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगडः-**

सादरीकरणात दर्शविण्यात आले की झाडांची लागवड करण्यात आलेली आहे, तर ती नेमकी कुठे लावण्यात आलेली आहेत याबाबत खुलासा व्हावा.

प्रकल्प प्रवर्तक यांनी माहिती दिली की कार्यरत प्रकल्पात वेळोवेळी झाडे लावण्यात आलेली आहेत. तसेच मागच्या वर्षी खाण कार्यान्वित असताना, झाडे लावण्यात आलेली आहेत.

त्यावेळी श्री गोविंद रामचंद्र निवासे यांनी विचारणा केली की जरी वनस्पतींची लागवड (plantation) केलेली असली तरीही तेथे झाडे लावण्यात

आलेली आहेत काय? २०१५ पासून प्रकल्प स्थानात खोल खड्डे करण्यात आलेले आहेत. त्याठिकाणी झाडांची लागवड करण्यात आलेली आहे काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की जेथे जेथे खड्डे आहेत, त्याठिकाणी टप्याटप्याने वृक्षलागवड करण्यात येत आहे. तेथे लेव्हलींग करावे लागते, ते करण्यात येईल. वरच्या भागातील खड्ड्यामध्ये लेव्हलींग करुन झाडे लावण्यात आलेली आहेत.

श्री गोविंद रामचंद्र निवासे यांनी सांगितले की येथील स्थानिकांचे म्हणणे आहे की हे खड्डे अवाढव्य आहेत. त्या खड्ड्यातील पाणी येथील स्थानिकांच्या पिण्याच्या पाण्यात मिसळते, त्यामुळे पिण्याचे पाणी हे धुळीमय, गढूळ असते. तरी याबाबत ठोस निर्णय घेण्यात यावा ही स्थानिकांची मागणी आहे, कारण येथे पाण्याची समस्या आहे असे आम्हां स्थानिकांचे म्हणणे आहे.

त्यावेळी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ज्यावेळी खाणीसाठी उत्खनन करण्यात येते, त्यावेळीच वृक्षारोपण करण्याचे नियोजन करण्यात येते. खाणीच्या बाजूस ७ १/२ मीटरचा भाग हा राखीव ठेवण्यात येतो. त्या राखीव भागात वृक्षारोपण करण्याचे नियोजित केलेले असते. जर करण्यात आलेल्या खड्डामध्ये जर खनिजांचा साठा असेल, तर तेथील खनिज साठा काढल्यानंतरच जोपर्यंत ती जागा बुजवून टाकत नाहीत, तोपर्यंत त्या खड्ड्याच्या जागेवर वृक्षारोपण करता येत नाही. तरीही खड्ड्यांमुळे तेथे कोणतेही अपघात होऊ नये म्हणून तेथे अडथळे (barriers) उभारण्यात येतील.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना व पर्यावरण सल्लागार यांना सूचना केली की उपस्थितानी तीन विषयांवर आक्षेप नोंदविलेले आहे. तर वृक्षलागवड हा एक मुद्दा, खाणकाम करताना जे खड्डे तयार होतात त्याबाबत पुढील नियोजन हा दुसरा मुद्दा व पाण्याची अडचण होऊ नये हा तिसरा मुद्दा. या तीन्ही मुद्द्यांवर ठोस उपाययोजना करण्यात याव्यात. खाणीतील पाणी पिण्याचे पाण्यात मिसळते

हा आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. तरी विस्तारिकरण करताना खाणीतील पाणी पिण्याच्या पाण्यात न मिसळण्याची उपाययोजना करण्यात यावी. शासनातर्फे पिण्याच्या पाण्यासाठी ज्या काही स्थानिक योजना राबविण्यात येतात, म्हणजे लिफ्ट इरिगेशन, त्याबाबत नियोजन करण्यात यावे. जरी प्रकल्प प्रवर्तकांनी झाडे लावली, पण पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला नाही, तर त्यांनी पुढे काय करावे हा स्थानिकांना भेडसावत असलेला प्रश्न आहे.

२) **श्री विद्‌यानंद शिवराम पवार, राहणार-मेघरे गाव, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड, मुंबईत अध्यक्ष, मुंबई सिध्दार्थ ग्रामसेवा मंडळः-**

येथे आज मेघरे बॉक्साईट खाणीच्या प्रस्तावित विस्तारिकरणाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस जमलेलो आहोत. मात्र येथे असे निदर्शनास येते की येथे स्थानिक गावांतील ग्रामस्थांची उपस्थिती ही फक्त १०% आहे. ग्रुप ग्रामपंचायत मेघरे बरडोली हद्‌दीत फक्त १०-१५% लोक राहतात. उर्वरित स्थानिक लोक हे मुंबईत स्थलांतरित झालेले आहेत. जर येथील ७०-८०% लोक मुंबईत स्थलांरित झालेले आहेत, तर त्यातील किती लोकांना या बैठकीस बोलविण्यात आलेले आहे? जर येथील ७०-८०% लोक मुंबईत आहेत, ते आलेले नाहीत, तर त्यांच्या अनुपस्थित जो निर्णय घेण्यात येईल, त्यास जबाबदार कोण? पर्यावरण हा सर्वात महत्वाचा विषय आहे.

यापुर्वीही चिखद ग्रामपंचायतीच्या हद्‌दीतून दहा वर्षापुर्वी आशापुरा कंपनीतर्फे मायनिंग सुरु झालेले होते. त्या कंपनीने येथील सर्व बॉक्साईट काढून नेलेले असून येथील सर्व क्षेत्र हे भकास केलेले आहे. त्यांनी एकही झाड लावलेले नाही. तसेच सादरीकरणात दर्शविल्यानुसार जरी मे. ज्ञानलक्ष्मी डेव्हलपर्स जरी वृक्षारोपण करण्याचे आश्वासन देत असले, तरीही येथून जे टँकर्स, डंपर्स जातात, त्यावर छत नसते, आम्ही रोज प्रवास करतो, दर पंधरा दिवसांनी येत असतो. येथील टँकर्स, डंपर्स असणा-यांची मुजोरी इतकी असते की आम्ही स्थानिक ती

सहन करुच शकत नाही. गावाला होणारा त्रास आम्ही कदापीही सहन करणार नाही.

येथे उपस्थिती कमी असल्याने मेघरे बरडोली ग्रुप ग्रामपंचायतीने प्रस्तावित प्रकल्पास परवानगी देऊ नये असे मी अध्यक्ष, मुंबई सिध्दार्थ ग्रामसेवा मंडळ म्हणून ठासून सांगतो.

पर्यावरण बिघडले तर आम्हांला पाणीसुध्दा मिळणार नाही. यापूर्वी १०-१५ वर्षे खाणकाम या परिसरात चालू होते, तर मेघरे, बरडोली, बापुली ग्रामस्थ पाण्यापासून वंचित होते. जरी प्रकल्प प्रवर्तकांनी आम्हांला पाणी आणून दिलेले असेल, तरी ती काही मेहरबानी नाही, कारण आपणच पाणी घालवणार व आपणच पाणी देणार.

मागील ग्रामसभा ही तहकूब झालेली होती. त्यामुळे कुठल्या ग्रामसभेत प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणास परवानगी देण्यात आली हे मला माहित नाही. तरी ग्रामसभेच्या परवानगीशिवाय हा प्रकल्प सुरु करु नये. यास संपूर्ण गावक-यांचा विरोध असेल. शेजारील ग्रामपंचायत दापोली-मापोली ही मोठी ग्रामपंचायत आहे. त्यांनाही येथे बोलविण्यात आलेले नाही.

तरी मला प्रतिपादन करायचे आहे की संपूर्ण ग्रामपंचायतींनी या प्रकल्पास मंजूरी दिल्याशिवाय आपण प्रकल्प मंजूर करु नये. संपूर्ण ग्रामपंचायतींना बोलावून त्यांची परवानगी घेण्यात यावी. मात्र आमच्या मेघरे ग्रामपंचायतीकडून आपणास परवानगी मिळणारच नाही. मात्र दिल्यास आम्ही न्यायालयात दाद मागणार आहोत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले जनसुनावणीच्या सुरवातीस सांगण्यात आलेले आहे की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती प्रकल्पास मंजुरी देत नाही, प्रकल्प नाकारत नाही किंवा प्रकल्पाची शिफारससुध्दा करत नाही. प्रस्तावित प्रकल्पाविषयी प्रकल्प प्रभावित क्षेत्रातील जनतेने प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेल्या

पर्यावरणीय सूचना, विचार, टीकाटिप्पणी किंवा आक्षेप यांची नोंद घेण्यासाठी गठित करण्यात आलेली आहे. आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात येत आहे. बैठकीचे व्हिडिओ शुटिंगसुध्दा चालू आहे. बैठकीच्या इतिवृत्तात उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेपांचा समावेश करण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त हे मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या मान्यतेने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

तसेच पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार (EIA Notification, 2006) पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीच्या तीस दिवस अगोदर एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत (येथे मराठीत) व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. सर्वांना तसेच पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थांना येथे उपस्थित राहण्याची सूचना करण्यात आलेली होती. तसेच सदरहू जनसुनावणी आयोजित करण्याची परवानगी ही शासनाने दिलेली आहे. तरी आपण प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपल्या ज्या काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप आहेत, ते नोंदवावेत. त्याची दखल शासन घेईल.

**३) श्री रामचंद्र काजारे, अध्यक्ष,आदर्शवाडी ग्रामस्थ मंडळः-**

येथे आताच आमचे एक ग्रामस्थ श्री विद्यानंद शिवराम पवार यांनी येथे आशापुरा कंपनीने केलेल्या खाणकामामुळे स्थानिक पर्यावरणाची झालेली हानी व स्थानिकांना होत असलेला त्रास याबाबत माहिती सांगितलेली आहे. आशापुरा कंपनीने २०-२५ फुटांचे खड्डे करून ठेवलेले आहेत. आशापुरा कंपनीने

नियमांनुसार ते खड्डे बुजवून तेथे वृक्षारोपण केलेले नाही. ते तसेच पडून आहेत. रान जाणारी गुरे तेथे पडण्याची जास्त शक्यता आहे.

आमच्या बोअरिंगला खूप छान पाणी येत होते. मात्र. ही मायनिंग सुरु झाल्यापासून गेल्या एप्रिलपासून आमच्या बोअर विहिरीला पाणी कमी येते. भूगर्भात जमिनीचे अनेक झरे वाहत असतात. जसे आपल्या शरीरात मांस व हाडे असतात, तसेच जमिनीत दगड हे जमिनीची हाडे आहेत. मायनिंग केल्याने जमीनीत कंप होतो. जरी मायनिंग करणारे म्हणतात की आम्ही ब्लास्टींग करत नाही, तरीही १०-१५ फुटांखालील दगड काढताना जमिनीत हादरे बसत असलीत व भूगर्भागीत झ-यांवर त्यांचा निश्चितच परिणाम होत असले, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळेच आमच्या बोअर विहिरीचे पाणी कमी झालेले आहे.

तरी यामुळेच या मायनिंग प्रकल्पाच्या विस्तारीकरणास आमचा आक्षेप आहे. तसेच या प्रकल्पामुळे स्थानिक पर्यावरणाचा -हास होत आहे. आम्ही ग्रामस्थांनी एक उघडा ट्रक पकडला होता. वाहनचालकास बंद का केले नाही असे विचारले असता त्याने उत्तर दिले की बंद करण्यासाठीचे ताडपत्री हे ट्रकमध्येच राहिले. तर त्या वाहनचालकांवर लक्ष कोण ठेवणार याबाबत काहीही नियोजन नाही.

येथील गावांमधून कंपनीच्या मालाचे ट्रक्स हे भरधाव वेगाने जात असतात. येथील शाळेत पायी जाणा-या मुलांच्या जीवीताला त्यामुळे धोका आहे. याबाबत उपाययोजनांचे उत्तर आम्हां ग्रामस्थांना हवे आहे.

आता या कार्यरत प्रकल्पात ७५,००० टन प्रतिवर्ष उत्पादन ५,००,०००.० टन प्रतिवर्ष करण्याचे नियोजित केलेले आहे. तर येथील जंगलाचे काय होणार?

अशा खाणींच्या उपक्रमामुळेच पुणे जिल्ह्यात माळीण गावात संपूर्ण डोंगर खचला व गावातील कित्येकांना प्राणास मुकावे लागले.

तरी या खाणीच्या विस्तारिकरणास आमचा विरोध आहे.

**४) श्री महादेव घोरपडे, राहणार-आदर्शवाडी,तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगडः-**

माझ्या असेही निर्दशनास आलेले आहे की कंपनीने एकही झाड लावलेले नाही. सर्व खड्डे खणलेले तसेच आहेत. या मायनिंगमुळे पाण्याचा प्रश्न गावात उद्भवलेला आहे. आता येथे खूप लोकांनी शहरात स्थलांतर केलेले आहे. प्रकल्प प्रभावित गावातील खूप लोक येथे येऊ शकलेले नाही. खूप लोक मुंबईला गेलेले आहेत. गावातील ग्रामसभेला सुध्दा लोक उपस्थित राहू शकत नाही. बैठकीस सर्वजण असतानाच ही बैठक आयोजित करणे योग्य होईल. तरी या मायनिंग विस्तारिकरण प्रकल्पामुळे आमचे नुकसान होणार आहे. आमचा या प्रकल्पास विरोध आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिति

यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी किंवा आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

**५) श्री सुनंद रेड्डी, पर्यावरणवादी, राहणार-तेलंगणाः-**

मी प्रकल्प व्यवस्थापनाचे प्रकल्पाचे प्रस्तावित विस्तारिकरण योजिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करत आहे.

या जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावर काही परिणाम होतो का हे तपासणे हा आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय द्वारे घेतला जातो. पर्यावरणाबाबत काही सूचना असल्यास भारत सरकार त्यांचा विचार करते.

पर्यावरणवाद्यांची अशी इच्छा आहे की या खाणकाम प्रक्रियेमुळे अजिबात प्रदूषण होऊ नये. खाणकाम ही सरकारी मालमत्ता असते; सोने, चांदी किंवा इतर कोणत्याही खनिजाचे खाणकाम असो, सरकारच त्यासाठी लीज (भाड्याने) देते.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना आतापर्यंत उपस्थितांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की श्री रामचंद्र काजारे यांनी आशापुरा कंपनीबाबत काही आक्षेप उपस्थित केलेले आहेत. त्याबाबहत आम्ही काहीही उत्तर देऊ शकत नाही. त्यास आम्ही बांधिल नाही. ही जनसुनावणी ज्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी आहे, त्याबाबत आम्ही उत्तर देण्यास बांधिल आहोत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पात जे खड्डे करणार आहोत, ते ५-१० मीटर खोलीचे राहणार आहे. त्या खड्डयातील/तेथील बॉक्साईट काढल्यानंतर तो भाग त्वरित फेन्सिंग करण्यात येणार आहे. फेन्सिंग केल्यानंतर त्यात जे पावसाचे पाणी साचेल, ते rain water structure म्हणून उपयोगात आणण्यात येणार आहे. तसेच उपस्थितांचे म्हणणे बरोबर आहे की त्या खड्ड्यात जनावरे व अनवधाने माणसे पडू शकतात. तरी एकदा त्या खड्ड्यातील उत्पादन संपले (abandon) की त्यास तारेचे कुंपण घालण्यात येणार आहे. ते rain water structure म्हणून वापरण्यात येईल.

दुसरा आक्षेप होता की खाणीमुळे पाण्याचा -हास/क्षय (water depletion) होतो. तर त्यास उत्तर आहे की खाण प्रकल्प हा पर्वतावर आहे. तर जमीनीतील पाण्याच्या पातळीस त्यामुळे काहीही संपर्क होणारच नाही. किंबहुना त्या खड्ड्यात पाणी साचल्यामुळे ते rain water harvesting म्हणून काम करेल. तरी खाणीमुळे पाण्याचा -हास/क्षय (water depletion) होणार नाही याची मी ग्वाही देतो.

पुढील आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे की बंद/परित्यक्त खड्याचा धोका (abandoned pit danger). तर त्यास उत्तर आहे की त्या खड्ड्यास

प्रदूषण पूर्णपणे रोखणे (झिरो पोल्युशन) अत्यंत महत्त्वाचे आहे. अर्थात, खाणकामातून मिळणारे उत्पन्नही महत्त्वाचे आहेच; तरीही प्रदूषण न होऊ देणे ही प्राथमिकता असायला हवी.

मी कारखाना व्यवस्थापनाला अशी विनंती करतो की, त्यांनी प्रदूषण पूर्णपणे रोखण्याची खबरदारी घ्यावी आणि ग्रामस्थांनी मांडलेल्या सूचनांचाही विचार करावा.

तुमच्याकडे ५५.० हेक्टर जमीन आहे. कृपया एका वेळी एका हेक्टरप्रमाणे काम करा. एका हेक्टरचे काम पूर्ण झाल्यानंतर, त्यातील खाणकामामुळे तयार झालेला खड्डा जलसंधारणाच्या कामासाठी (पाणी साठवणुकीसाठी) वापरा किंवा उरलेल्या जमिनीवर वृक्षारोपण करा.

मी पुढे सूचना करत आहे की, सामान्य रोपांऐवजी फळ देणारी आणि औषधी गुणधर्म असलेली रोपे लावण्याला प्राधान्य देण्यात यावे.

तसेच, ग्रामस्थ आणि सरकारी अधिकारी यांच्यासह एक समन्वय समिती स्थापन करा. त्या क्षेत्राच्या विकासासाठी सीएसआर (CSR) निधीचा वापर करून लोकांच्या गरजेनुसार-मागणीनुसार सामाजिक कामे करणे आवश्यक आहे.

मी हे देखील सुचवत आहे की, येथे ३७ जणांना रोजगाराच्या संधी मिळणार असल्याची माहिती दिली जावी आणि त्या संधी केवळ स्थानिक लोकांनाच दिल्या जाव्यात.

स्थानिक तरुण-तरुणींना रोजगारासाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने, सरकारच्या मदतीने त्यांच्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयोजन करण्याची मी सूचना करत आहे. त्यांना येथे रोजगार न मिळाल्यास, इतर क्षेत्रांतही त्यांना संधी मिळू शकतील.

मी MoEFCC ला परवानगी देण्याचे आवाहन करतो. त्याचबरोबर, कृपया प्रकल्पात 'शून्य प्रदूषण' (Zero pollution) याचा विचार करण्यात यावा.

आम्ही लगेचच फेन्सिंग करणार आहोत. त्यामुळे जनावरांना, वन्यप्राण्यांना धोका होणार नाही.

श्री सुनंदा रेड्डी यांनी प्रस्तावित प्रकल्पाने झिरो प्रदूषण ही सकंल्पना राबविण्याची मागणी केली. तर महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या प्राथमिक मान्यतेनुसार (Terms of Reference), पर्यावरण प्रभाग मुल्यांकन अहवालानुसार (Environment Impact Assessment Report ) आणि पर्यावरण व्यवस्थापन योजनेत जे काही पर्यावरणीय संरक्षण उपाययोजनाबाबत जे निर्देश देण्यात येतील, त्यांची पूर्णपणे अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच या जनसुनावणीत स्थानिक जनता ज्या सूचना व उपाययोजना सांगतील, ते आम्ही निश्चितपणे अंगिकारणार आहोत. प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पामुळे कुठलाही त्रास होणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

श्री सांदिपन रेड्डी यांनी रेन वॉटर हार्व्हेस्टिंग, फळझाडे व औषधी वनस्पतींची लागवड करण्याबाबतची सूचना आम्ही निश्चितपणे विचारात घेणार आहोत. तेथे आंब्याची, काजूची झाडे लावण्यात येतील.

श्री रेड्डी यांनी सीएसआर निधीच्या वापरासाठी समन्वयक समिती गठित करण्याची सूचना स्विकारण्यात आलेली आहे. स्थानिक ग्रामपंचायत, स्थानिक प्रतिष्ठित, सामाजिक कार्यकर्ते यांना विश्वासात घेऊन जनतेस ज्याची गरज आहे (demand oriented scheme) त्यानुसारच सीएसआर निधी खर्च करण्यात येईल.

बैठकीत प्रकल्पातून उत्पादके घेऊन जाणारी ट्रक्स वेगाने जात असल्याने अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात असल्याची भिती व्यक्त करण्यात आलेली आहे. तर त्यासाठी प्रकल्पातीलच कर्मचारी रस्त्यावर उभे राहून त्या वाहतुकीवर नियंत्रण व मार्गदर्शन करणार आहेत. त्यांना वेगाने वाहन नेण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की बैठकीत सुचविल्याप्रमाणे एक हेक्टर खाणकाम करण्यात यावे व त्यानुसार टप्याटप्यानेच पुढे काम करण्यात यावे. त्यामुळे खाणीतून काढण्यात आलेला मलबा (debris) हा लगेच वापरून तेथेत समतल/लेवलिंग करता येईल.

त्यावेळी प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की या खाणीत ओ.बी. (O.B.) निघणारच नाही. खाणीत २-३ प्रकारचे खनिज निघते. त्यात हायग्रेड व लोग्रेड खनिजे असतील. सर्व खनिजांना बाजारात भाव आहे. तर त्या खड्ड्यास तारेचे कुंपण घालून तेथे हरितपट्टा विकसित करण्यात येईल. शासनाने मायनिंग योजना (Mining Plan) मंजूर केलेली आहे. खाणकाम बंद झाल्यानंतर त्या मायनिंगचे रुपांतर हे rain water structure म्हणून वापरण्याचे निर्देश भारत सरकारने दिलेले आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की संपूर्ण उत्खनन (excavation) झाल्यानंतर मायनिंग क्षेत्र हे पाझर तलावासारखे होईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की खाणखड्याबाहेर फेन्सिंगबरोबरच तेथे फळझाडे व औषधी वनस्पती लावण्यात याव्यात. त्यास पर्यावरण सल्लागार यांनी तसे करण्याची हमी देताना सांगितले याबाबत शासनाच्या संबंधित विभागाशी संपर्क करण्यात येऊन योजना अंमलात आणण्यात येतील.

६) **<u>श्री बाळकृष्ण देवगे हरपाल, सरपंच,ग्रुप ग्रामपंचायत मेघरे, तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-</u>**

ग्रुप ग्रामपंचायतमध्ये दोन गावे आहेत - मेघरे आणि भरडोली. तसेच पाच वाड्या आहेत. त्या पाच वाड्यांचे मेघरे भरडोली विकास मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे. या विकास मंडळाच्या सभेत प्रस्तावित प्रकल्पास सहमती देण्याचा विषय सर्वांना वाचून सर्व वाड्यांची प्रकल्पास विस्तारिकरण

करण्याची सहमती घेण्यात आलेली आहे. त्यावेळी चर्चेत प्रकल्प प्रवर्तकांनी ज्या विषयांची झाडे लावणे आवश्यक आहे, त्याची लागवड करणे, गाड्या झाकूनच वाहतुक करणे, गाड्या कमी वेगाने चालविणे याविषयांवर चर्चा होऊन त्याबाबत कंपनीने सर्व निर्देश पाळूनच उत्खननास परवानगी देण्यात यावी. त्यानुसार कंपनीस अटी व शर्तींचे पालन करण्याची सूचना देऊनच सहमतीचे पत्र पाठविण्यात आलेले आहे.

तरी प्रकल्प प्रवर्तकांनी सहमती पत्रानुसारच काम करावे.

**७) <u>श्री मंगेश रमेश होमनाक, माजी पंचायत समिती सदस्य, ग्रुप ग्रामपंचायत-मेघरे, तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-</u>**

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस आलेल्या सर्व उपस्थितांचे ग्रामपंचायतीतर्फे स्वागत. कंपनी त्यांच्या सीएसआर निधीतून ग्रामपंचायतीतील विविध सामाजिक उपक्रमांना मदत करते. मात्र पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती आहे की ग्रामपंचायतीचा जो मुद्रांक शुल्क असतो, तो आजपावेतो ग्रामपंचायतीस प्राप्त झालेला नाही. गेले दहा वर्ष ग्रामपंचायतीस मुद्रांक शुल्क प्राप्त झालेला नाही. मा. मंत्रीमहोदयांमार्फत पत्रव्यवहार करुनही आम्हांला काहीही फायदा झालेला नाही. आपण आमच्या जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी आहात. तर ग्रामपंचायत क्षेत्राचा विकास करण्यासाठी आम्हांला मुद्रांक शुल्क मिळावे अशी सर्व ग्रामपंचायतीतर्फे आपणास विनंती करण्यात येत आहे.

दुसरी गोष्ट प्रकल्पास विरोध नाही. मात्र प्रकल्प सुरु झाल्यापासून रोजगाराच्या संधिचे प्रमाण कमी आहे. मात्र रोजगार वाढलेला आहे. येथे दोन ग्रामपंचायती व पाच वाड्या आहेत, त्यानुसार कंपनीचा सीएसआर निधी वाढवून येथे विकास काम केली पाहिजे. तरी सीएसआर निधी वाढविण्याची कंपनीस विनंती राहिल.

**८) <u>श्री मदन अशोक पवार, राहणार-मेघरे,तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-</u>**

गेले दोन वर्षे येथे मायनिंग चालू असून येथील स्थानिकांना रोजगार प्राप्त झालेला आहे. श्रीवर्धनमध्ये एमआयडीसी नाही. पर्यटनवगळता येथे कोणताही प्रकारचा रोजगार नाही. माईन्समुळे खूप लोकांनी रोजगारासाठी गाड्या घेतलेल्या आहेत. स्थानिक मजूरास मजूरी मिळत आहे. मी पर्यावरणवादी आहे. मात्र या प्रकल्पाचे विस्तारिकरण करताना स्थानिक पर्यावरणाचा -हास होऊ नये.

तसेच केंद्र व राज्य शासनाने पारित केलेल्या अटी व शर्तीनुसार प्रकल्प प्रवर्तकांनी हा प्रकल्प चालू ठेवावा. बैठकीत स्थानिकांनी आक्षेप नोंदविलेला आहे की प्रकल्पातून उत्पादन घेऊन जाणा-या गाड्या या नियम डावलून वेगात जातात. रस्ते लहान आहेत. त्यामुळे अपघात होण्याचे जास्त शक्यता आहे. याची सर्व काळजी प्रकल्प प्रवर्तकांनी घेणे उचित होईल.

मी प्रकल्पाच्या विरुध्द अजिबातच नाही. मात्र कंपनीने सीएसआर निधी वाढवून तो स्थानिक गावातच खर्च करावा. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर स्थानिकांना रोजगाराची संधि प्राप्त झालेली आहे,तसेच ग्रामपंचायतीचे उत्पन्नसुध्दा वाढलेले आहे.

तरी येथील वाड्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या ज्या समस्या आहेत, त्यास सीएसआर निधितून मदत करण्यात यावी. त्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन दिले, तर येथे प्रकल्पाविषयी कोणतीही नाराजी नाही. ग्रुप ग्रामपंचायत मेघरे व भरडोली व येथील पंचक्रोशीतील युवक-युवतींना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे व हा प्रकल्प शासनाने पारित केलेल्या अटी व शर्तीनुसार कार्यान्वित ठेवण्यात यावा.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, विचार किंवा आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

**९) श्री योगेश गोविंद निवाते, सदस्य, ग्रुप ग्रामपंचायत, वाढोली, तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-**

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस येथील स्थानीक उपस्थित राहून त्यांनी संबंधित मायनिंग प्रकल्पाबाबत आपल्या व्यथा मांडल्यात याबद्दल त्यांचे आभार. ज्या व्यथा मांडल्या, त्यांचे निराकरण केल्याशिवाय हा प्रकल्प यशस्वीपणे चालू शकणारच नाही.

या जनसुनावणी अगोदर सर्व ग्रामपंचायत व विकास मंडळे यात प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणाबाबत चर्चा झालेली आहे. त्यानुसार आपण सर्वानुमते या प्रकल्पास मान्यता दिलेली आहे.

सर्वानुमते असे ठरले आहे की प्रकल्पाने शासनाने पारित केलेल्या सर्व अटी व शर्ती यांचे पालन करुनच प्रकल्प कार्यान्वित करण्यात यावा. तसेच उत्पादन पूर्ण झाल्यानंतर त्या जागेचे संपुर्ण लेव्हलींग करुन त्यावर झाडे लावण्यात येतील अशी लेखी हमी घेण्यात आलेली आहे.

आता प्रश्न रोजगाराचा. तर आम्हांला रोजगार मिळालेला आहे. तसेच विस्तारिकरण प्रकल्पात जो अतिरिक्त रोजगार लागेल, त्यात स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात यावा.

आता पिण्याच्या पाणी संदर्भात. तर सीएसआर निधीतून ₹ २,८३,००० एवढी रक्कम पाणी योजनेसाठी प्राप्त झालेली आहे. तसेच परिसरातील विविध गावांमध्ये सामाजिक उपक्रमांना कंपनीकडून निधि उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**आता पुढील मुद्दा आहे वाहतुकीचा** -

तर प्रकल्पातून उत्पादन घेऊन जाणा-या गाड्या जर ताडपत्री लावली नसेल, तर त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. त्यासाठी तशा गाड्या मी थांबवून ठेवतो व एक तास उशिरा सोडतो. आम्ही त्याबाबत निश्चतच काळजी घेऊ.

**पुढील मुद्दा - पाण्याचा -**

तर प्रस्तावित प्रकल्पात डोंगरावर ब्लास्टींग होणारच नाही. जे खोदकाम होते, ते ब्रेकींग आहे. ब्रेक फक्त १.५ ते २ फुटांपर्यंतच होतो. त्यामुळे काही पाण्याचा प्रश्न होईल असे मला वाटतच नाही.

आता प्रश्न आहे खड्ड्यांचा. पूर्वीच्या आशापुरा कंपनीने गावातील कोणत्याही व्यक्तीस विश्वासात घेतले नाही. ती कंपनी ब्लास्टींग करायचे, त्यावेळी आमच्या गावाला तडे जायचे. नंतर सर्व नागरिकांच्या सहाय्याने तो प्रकल्प आम्ही बंद केला.

आता या विस्तारिकरण प्रकल्पात ब्लास्टींग करण्यात येणार नाही. ब्रेकींग करुनच बॉक्साईट काढण्यात येईल हे मान्य करुनच आपण सर्वानुमते प्रकल्प विस्तारिकरणास मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पामुळे आम्हांला कोणताच त्रास नाही.

**मुलभूत गरजा -**

प्रकल्प परिघातील विविध गावांच्या ज्या काही मूलभूत गरजा आहेत, त्या कंपनी टप्याटप्याने पूर्ण करणार आहे.

नुकत्याच हा विषय आम्ही ग्रामपंचायतमध्ये घेतला व त्यास ग्रामपंचायतीने मान्यता दिलेली आहे.

याअगोदर येथील ग्रामपंचायतीस उत्पन्नाचा स्त्रोत व स्थानिकांना रोजगार देणारी कुठलीही कंपनी आलेली नाही. तर असे प्रकल्प येत असतील, तर ते आपण नाकारावे का? तसेच कंपनीने हरितपट्टा विकासाचे आश्वासन देताना झाडे लावण्याची हमी दिलेली आहे.

जर प्रकल्प आलेच नाही, तर परिसराचा, येथील स्थानिकांचा विकास कसा होणार?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी श्री योगेश निवाते यांना पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याची सूचना केली.

१०) **<u>श्री प्रशांत विश्वनाथ शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी सभापतीः-</u>**

याआधी येथे दोन मायनिंग कंपन्या येऊन गेल्या. आता ज्ञानलक्ष्मी डेव्हलपर्स येथे मायनिंग करत असून कार्यरत प्रकल्पाचे विस्तारिकरण करण्याचे नियोजित केलेले आहे. या श्रीवर्धन तालुक्यात कुठलाही रोजगाराची संधी नसल्याने येथील ७०-८०% लोक हे रोजगारासाठी मुंबईला गेलेले आहेत. मात्र या प्रकल्पामुळे येथील स्थानिकांना रोजगाराची संधि प्राप्त झालेली आहे. स्थानिकांचे १२६ डंपर्स, पीकअप, पाण्याचे टँकर्स या कंपनीसाठी असून त्यामुळे जवळजवळ १,००० लोकांचा उदरनिर्वाह या कंपनीमुळे चालू आहे. झाडे जगलीच पाहिजे असे माझे म्हणणे आहे. कंपनी दरवर्षी झाडे लावण्याचा कार्यक्रम हाती घेते, सर्वांना बोलाविते. तर ती लावलेली झाडे जगली पाहिजे याबाबत आपण धोरण राबवावे.

बैठकीत कंपनीमुळे पर्यावरणाचा -हास होणार आहे असे काहींनी मत मांडलेले आहे. मात्र या कंपनीमुळे या परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात (indirect business) प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. मात्र पर्यावरणाचा -हास होणार नाही यासाठी कंपनीने विशेष लक्ष दिले पाहिजे.

येथे आरोप करण्यात आलेला आहे की जे कंपनीतून डंपर्स बाहेर पडतात,त्यावर ताडपत्री लावलेली नसते. मात्र अशा घटना दोन वर्षांपूर्वी होत होत्या. मात्र आता नियम कडक केल्याने ते प्रमाण कमी झालेले आहे. मात्र जर डंपर्सला ताडपत्री नसेल तर त्या कंत्राटदारास दंड ठोकण्यात यावा. मी सामाजिक कार्य करतो, बरेच लोक नोकरी मागण्यास येतात. तर अशा कंपन्या वाढल्याच पाहिजेत. कारण स्थानिक युवक युवतींना रोजगाराची संधि मिळेल. मी अशा कंपन्यांचे समर्थन करत आहे.

या कंपनीनेसुध्दा सीएसआर निधी हा विविध गावात वापरला आहे. बैठकीत काही स्थानिकांनी रस्ता खराब असल्याचे सांगितले. तर माझी मागणी

आहे की ही कंपनी एक टनाला आपल्याकडे रॉयल्टी भरते. करोडो रुपये शासनाकडे जमा होतात. त्यातील २५-३०% निधी रस्त्यासाठी जर या गावास उपलब्ध करण्यात आला, तर गावातील रस्त्यांवर एकही खड्डा राहणार नाही. तरी हा प्रकल्प येथे राहिला पाहिजे. प्रकल्पास माझे समर्थन आहे.

११) **<u>श्री बाबूराव विठ्ठल चोरगे, माजी सभापती, पंचायत समिती,गाव-तारिविणे, तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-</u>**

या प्रकल्पामुळे तालुक्यातील ब-याच तरुणांना रोजगार मिळालेला आहे. बैठकीत जे मुद्दे मांडण्यात आले, तेसुध्दा महत्वाचे आहेत.

आता पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती आहे की येथून जो खनिजचा निधी शासनात जातो,तो आमच्या गावाला मिळावा.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत मुद्रांकाचासुध्दा विषय घेण्यात आला. आता आपण मायनिंग रॉयल्टीबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. तर आपण एकदा जिल्हाधिकारी कार्यालय,अलिबाग,रायगड येथे आल्यास संबंधित विभागाशी चर्चा करण्यात येईल. तसेच जेव्हा डीपीडीसी असते, त्यावेळी हा विषय आपण आपल्या खासदारांबरोबर चर्चेत घ्यावा, तरी आपण नियोजन करुन जिल्हाधिकारी कार्यालयात आल्यास मुद्रांक व गौण खनिज हे दोन्ही विषय घेण्यात येतील.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, विचार, टीकाटिप्पणी किंवा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सुध्दा उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, विचार, टीकाटिप्पणी किंवा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांनी योग्य प्रकारे प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप

नोंदविल्याबद्दल व बैठक शांततेने पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानले व पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली. सोबत प्राप्त झालेल्या ६ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहोत.

| | |
|---|---|
| **(तानाजी पाटील)** | **(संजय भोसले)** |
| आयोजक, | सदस्य, |
| पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती | पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती |
| तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी-रायगड |
| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, |
| महाड | रायगड भवन, |
| | नवी मुंबई |

**(संदेश शिर्के)**

अध्यक्ष,

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,

जिल्हा - रायगड